
## कुठेही घेवून जावू शकाल हे हाऊस



घर घ्यायचे म्हटले की आधी पैशांचा, मग लोन घेण्याचा विचार आणि टेन्शन येते. प्लॉट घ्यायचा म्हटले तरी टेन्शन येते. पण आता या दोन्ही गोष्टींचे तुमचे टेन्शन दूर होणार आहे. कारण आता मुव्हेबल घरांचा ट्रेन्ड येऊ लागला आहे. अमेरिकेमध्ये अशी घरे आली सुद्धा आहे. हे घर तुम्ही कुठेही घेऊन जाऊ शकता आणि कुठेही राहू शकता.

हे घर १०६ स्क्वेअर फूटाचे असून नॉर्थ अमेरिकेत या घरांचा ट्रेन्ड वाढतो आहे. इथे अशाप्रकारची घरे घेऊन लोक डोंगरांमध्ये राहत आहेत. कारण त्यांना हव्या त्या ठिकाणी रहायला मिळत आहे.

हे लाकूड आणि फायबरपासून तयार करण्यात आलेले एक कॅबिन आहे. कधी ते याला त्यांचे ऑफिस बनवतात तर कधी घर बनवतात. या घराची किंमत १९ हजार यूरो म्हणजे भारतीय करन्सीच्या हिशोबाने १६ लाख रुपये आहे.

एकीकडे काही लोक आपल्या गरजांची लिस्ट वाढवत आहे तर दुसरीकडे काही लोक हे आपल्या गरजा कमी करु लागले आहेत. हे घर त्यांच्यासाठीच फायद्याचे आहे. काही वर्षांनी ही घरे भारततही आली तर नवल वाटायला नको.


## एक असा रहस्यमय समुद्र ज्यात कुणीही बुडू शकत नाही, जाणून घ्या कारण...

पृथ्वी अशा अनेक गोष्टी आहेत ज्या लोकांना आश्चर्यचकीत करतात. काही अशी ठिकाणं आहेत जी बघून त्यांवर विश्वासही बसत नाही. असंच एक रहस्य ठिकाण इस्त्राइल आणि जॉर्डनच्या मधे आहे ते म्हणजे डेड सी म्हणजे मृत सागर. डेड सी आपल्या अनेक गोष्टींमुळे नेहमीच खास राहिला आहे. डेड सी ची सगळ्यात खास बाब म्हणजे यात कुणीही बुडत नाही. कारण यात मिठाचं प्रमाण इतकं जास्त आहे की, तुम्ही यातील पाण्यावर झोपले तरी पाण्यात बुडणार नाहीत.

एका बाजूला इस्त्राईल दुसऱ्या बाजूला जॉर्डनचे सुंदर डोंगर आणि वेस्ट बँकने वेढलेला डेड सी चा नजारा डोळे दिपवणारा आहे. डेड सी पृथ्वीवीरल सगळ्यात खाली असलेला जलाशय आहे. हा समुद्र सपाटीपासून ४०० मीटर खाली आहे.

आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की, या जलाशयाला डेड सी असं नाव का पडलं? तर याचं कारण आहे की, यात मीठ जास्त असल्याने यात कोणताही जीव किंवा वनस्पती जिवंत राहत नाही. यात ३५ टक्के मीठ आहे. इतक्या जास्त मिठाच्या पाण्यात ना कोणतं झाड उगवतं ना कोणता मासा जिवंत राहतो. यातील पाणी सामान्य समुद्रातील पाण्यापेक्षा १० पटीने जास्त खारट आहे.

डेड सी मधील मीठ येथील वाळू आणि दगडांवर थर बनवून जमा झालं आहे. सोडिअम क्लोराइड असल्याने हे पाणी चमकत राहतं. अनेक पर्यटक इथे स्वीमिंग करण्यासाठी आणि यातील औषधी गुणांचा फायदा मिळवण्यासाठी येतात. डेड सी मधील मातीमध्ये त्वचेसाठी फायदेशीर हायएल्युरोनिक ॲसिड आणि अनेक खनिज असतात. इथे येणारे लोक शरीरावर मातीचा लेप लावून उन्ह घेतात. इस्त्राईलमधील हा डेड सी बघण्यासाठी जगाच्या वेगवेगळ्या भागातून भरपूर लोक येतात. डेड सी च्या आजाबाजूल अनेक आलिशान रिसॉर्ट आहेत. जे फार महागडेही आहेत. पण सध्या इस्त्राईल आणि हमासमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे इथे येणाऱ्या लोकांची संख्या कमी झाली आहे आणि हॉटेल्सचे भावही कमी झाले आहेत.



## भोपाल नजीकच्या किल्ल्यामध्ये आजही अस्तित्वात आहे पारस !



या जगामध्ये आज ही अनेक चमत्कारी वस्तू अस्तित्वात असल्याच्या अनेक कहाण्या, किस्से आपण ऐकत असतो, वाचत असतो. अशा चमत्कारी वस्तूंपैकी एक आहे 'पारस'. लोखंडाचे रूपांतर सोन्यात करणारा असा हा पारस आहे. पारस अस्तित्वात असल्याच्या अनेक कथा जरी सर्वश्रुत असल्या तर हा पारस प्रत्यक्षात कोणी पाहिल्याचे मात्र ऐकिवात नाही. मात्र भारतामध्ये एका किल्ल्यामध्ये हा पारस अस्तित्वात असून, हा जमिनीमध्ये पुरलेला आहे असे म्हटले जात असल्याने दरवर्षी अनेक हौशी मंडळी या किल्ल्यामध्ये पारस शोधण्यासाठी येत असतात.

मध्य प्रदेशातील भोपाल पासून सुमारे चाळीस किलोमीटरच्या अंतरावर रायसेन नामक एक किल्ला आहे. हा किल्ला ज्या राजाच्या अधिपत्याखाली होता, त्या राजाच्या संग्रही पारस असल्याची आख्यायिका आहे. हा पारस मिळविण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. हा पारस मिळविण्यासाठी अनेक धाडसी दरोडे या किल्ल्यावर घातले गेले, अनेक युद्धेही झाली. तेव्हा राजाने आपल्या संग्रही असलेला हा पारस इतर कोणाच्या हाती पडू नये यासाठी किल्ल्यामध्ये असलेल्या सरोवरामध्ये हा पारस टाकून दिला. आपण पारस सरोवरामध्ये टाकला आहे, याचा उल्लेख राजाने कोणापाशीही केला नाही. काही काळानंतर राजाचा अंत झाला, आणि राजा गेल्या नंतर शाही परिवारानेही अन्यत्र स्थलांतर केले. मात्र या परिवारापैकी पारसबद्दल कोणाला कसलीच माहिती नसल्याने राजाने सरोवरामध्ये टाकलेला पारस तिथेच राहून गेला.

कालांतराने सरोवरातील पाणीही सुकून गेले, पण सरोवराच्या तळाशी पारस सापडलाच नाही. हा किल्ला उजाड, वैराण झाल्यानंतरही अनेक राजांनी या किल्ल्यावर आपले सैन्य पाठवून त्यांच्या करवी पारस शोधण्याचे अनेक प्रयत्न केले, पण पारस कोणाच्याच हाती लागू शकला नाही. आजच्या काळामध्येही ज्यांना पारसबद्दलची आख्यायिका ठाऊक आहे, ती हौशी मंडळीही पारसच्या शोधार्थ रायसेनच्या किल्ल्यामध्ये येत असतात. मात्र पारस शोधण्याचे आजवरचे सर्वच प्रयत्न फोल ठरले आहेत.

# चांगल्या पगाराची नोकरी सोडून लष्करात दाखल झाले होते कॅ. विक्रम बत्रा

कारगिल युद्धात दहशतवाद्यांचा कर्दनकाळ ठरलेले देशाचे वीर सुपुत्र कॅ. विक्रम बत्रा यांना खरं तर मर्चन्ट नेव्हीत चांगली संधी मिळाली होती. पण निवड झाली असूनही त्यांनी सैन्यात जायचं ठरवलं. हाँगकाँगमधील एका शिपिंग कंपनीत मर्चन्ट नेव्हीमध्ये विक्रम यांची निवड झाली होती, पण त्यांनी सैन्यात जायचा मार्ग स्वीकारला.

याबाबत विक्रम बत्रा यांचे वडील गिरधारीलाल बत्रा सांगतात, १९९४ सालच्या प्रजासत्ताक दिवसाच्या परेडमध्ये एनसीसी कॅडेट म्हणून सहभागी झाल्यानंतर विक्रमने सैन्यातील करिअरचा गांभीर्याने विचार करायला सुरुवात केली. वास्तविक त्याची निवड मर्चन्ट नेव्हीमध्ये झाली होती. तो चेन्नईला ट्रेनिंगसाठी जाणार होता. त्याच्या ट्रेनचं तिकीटही काढून झालं होतं.

पण तिकडे जायच्या तीन दिवस आधी त्याने विचार बदलला. असं का करतोय, असं त्याच्या आईने विचारलं. तेव्हा तो म्हणाला, की आयुष्यात फक्त पैसाच सर्वस्व नसतो. मला काहीतरी मोठं करायचंय, सर्वांना आश्चर्य वाटेल असं, माझ्या देशाचं नाव मोठं होईल असं काहीतरी करायचंय. १९९५ साली तो आयएमएची परीक्षा पास झाला.

कारगिलमधील लढाईच्या काही महिने आधी कॅप्टन विक्रम बत्रा पालमपूरमधील त्यांच्या घरी आले होते, तेव्हा त्यांनी मित्रांना न्यूगल कॅफेमध्ये पार्टी दिली. तेव्हा त्यांचा एक मित्र म्हणाला, आता तू लष्करात आहेस. काळजी घे.

त्यावर विक्रम म्हणाले, काही काळजी करू नकोस. एकतर मी विजयी होऊन तिरंगा फडकावत परत येईन किंवा त्याच तिरंगात गुंडाळलेल्या स्थितीत परत येईन. पण परत येईन एवढं नक्की.

परमवीर चक्र विजेत्यांवर 'द ब्रेव्ह' हे पुस्तक लिहिणाऱ्या रचना बिष्त रावत म्हणतात, विक्रम बत्रा कारगिलच्या लढाईतील सर्वांत ओळखीचा चेहरा झाले होते. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा करिश्माच असा होता की, त्यांच्या संपर्कात आलेला कोणीही मनुष्य त्यांना विसरू शकायचा नाही. त्यांनी ५१४० शिखरावर ताबा मिळवल्यानंतर एका वृत्तवाहिनीशी बोलताना 'ये दिल माँगे मोअर' असं म्हटलं होतं. या उद्गारांनी त्यांनी संपूर्ण देशाची मनंही काबीज केली.

आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी सीमेवर जाऊन हौतात्म्य पत्करलेल्या कारगिल युद्धातील जवानांचा ते चेहरा बनले होते. विक्रम बत्रा लहानपणापासूनच साहसी व निर्भीड होते. एकदा त्यांनी स्कूलबसमधून पडलेल्या मुलीचा जीव वाचवला होता. विक्रम बत्रा यांचे वडील गिरधारी बत्रा त्यांच्या मुलाची आठवण सांगताना म्हणतात, ती मुलगी बसच्या दरवाज्यापाशी उभी होती आणि दार आतल्या बाजूने नीट बंद नव्हतं. एका वळणावर दरवाजा अचानक उघडला आणि ती मुलगी रस्त्यावर पडली. विक्रमने क्षणभरही विचार न करता चालत्या बसमधून खाली उडी टाकून त्या मुलीला गंभीर इजा होण्यापासून वाचवलं होतं.इतकंच नव्हे तर तो त्या मुलीला जवळच्या हॉस्पिटलमध्ये घेऊन गेला. 'तुमचा मुलगा आज शाळेत नाही गेला का', असं आमच्या एका शेजाऱ्यांनी आम्हाला विचारलं, तर तो शाळेत गेल्याचं आम्ही सांगितलं. यावर शेजारी म्हणाले, की पण आम्ही त्याला हॉस्पिटलमध्ये बघितलं. त्यानंतर आम्ही धावत हॉस्पिटलात गेलो तेव्हा आम्हाला सगळा घटनाक्रम कळला.

'परमवीर चक्र' मालिकेमुळे सैन्यात जायची प्रेरणा मिळाली. दूरदर्शन वाहिनीवरून १९८५ साली प्रसारित होणाऱ्या 'परमवीर चक्र' या मालिकेमुळे विक्रम यांच्या मनात भारतीय सैन्यामध्ये जायची तीव्र इच्छा निर्माण झाली. विक्रम यांचे जुळे बंधू विशाल बत्रा सांगतात, त्या वेळी आमच्याकडे टीव्ही नव्हता, त्यामुळे आम्ही शेजाऱ्यांकडे जाऊन टीव्ही बघायचो. त्या मालिकेत पाहिलेल्या गोष्टी एखाद्या दिवशी आमच्याच जगण्याचा भाग होतील, असं मला स्वप्नातही वाटलं नव्हतं.

सन १९९९ मध्ये होळीच्या सुट्टीदरम्यान विक्रम शेवटचे पालमपूरला आले होते. त्या वेळी त्यांचे आईवडील त्यांना सोडायला बसस्थानकावर गेले. आपण आपल्या मुलाला शेवटचे भेटतो आहोत, हे त्या मातापित्यांना त्या वेळी माहीत नव्हतंच. गिरधारीलाल बत्रा त्या दिवसाची आठवण सांगताना म्हणतात, बराचसा वेळ त्याने त्याच्या मित्रांसोबत घालवला. त्याच्या आईने त्याला खायला आवडतं म्हणून खास राजमा चावल, कोबीची भजी आणि घरगुती चिप्स तयार केले होते. परत जाताना त्याने सोबत घरात तयार केलेलं आंब्याचं लोणचंही घेतलं. आम्ही सगळे त्याला बसस्टँडपाशी सोडायला गेलो. बस सुरू झाल्यावर त्याने खिडकीतून हात हलवून निरोप दिला. माझे डोळे ओलावले. आमच्या लाडक्या विक्रमला आम्ही शेवटचे बघतोय, हे मला तेव्हा कसं माहीत असणार. त्यानंतर तो परतून आला नाही.



विक्रम बत्रा यांच्या आवाजात पहाटे ४ वाजून ३५ मिनिटांनी वायरलेसवरून एक संदेश मिळाला - 'ये दिल माँगे मोअर.' कारगिलमधील त्यांचे कमांडिंग ऑफिसर कर्नल योगेश जोशी यांनी विक्रम आणि लेफ्टनंट संजीव जामवाल यांच्यावर ५१४० शिखरावरची चौकी ताब्यात घ्यायची जबाबदारी दिली होती. रचना बिश्त रावत म्हणतात, विक्रम बत्रा यांच्या '१३ जॅक अलाय' या युनिटला ५१४० शिखरावरील पाकिस्तानी तळावर हल्ला करून ते शिखर पुन्हा भारताच्या ताब्यात घेण्याची जबाबदारी देण्यात आली. कर्नल योगेश जोशी यांच्याकडे दोन तरुण अधिकारी होते- एक होते जामवाल, आणि दुसरे होते कॅप्टन विक्रम बत्रा. त्यांनी दोघांनाही बोलावलं आणि एका मोठ्या खडकाआडून बोटाने शिखर दाखवलं. त्या शिखरावर चढाई करायची असल्याचंही सांगितलं. रात्रीच मोहीम सुरू होईल आणि सकाळपर्यंत तुम्हाला वर पोचावं लागेल, असं कर्नलनी दोघांना सांगितलं.

मोहीम फत्ते झाल्यावर तुमचा कोड काय असेल, असं त्यांनी दोघा अधिकाऱ्यांना विचारलं. दोघं वेगवेगळ्या बाजूंनी चढाई करणार होते. लेफ्टनंट जामवाल म्हणाले, 'सर मी, ओ ये ये ये, असा कोड देईन.' विक्रम म्हणाले, 'मी, ये दिल माँगे मोअर, असं म्हणेन'.

कारगिलचा 'शेरशाह'


रचना बिश्त रावत पुढे सांगतात, लढाई सुरू असताना कर्नल जोशी यांना वॉकी-टॉकीवर एक 'इंटरसेप्टेड' संदेश ऐकायला मिळाला. या लढाईत विक्रम यांचं कोड-नेम 'शेरशाह' होतं.

पाकिस्तानी सैनिक त्यांना म्हणत होते, 'शेरशाह, तू परत जा, नाहीतर तुझं प्रेत परत जाईल.' यावर विक्रमचा आवाज थोडा धारदार झाल्याचं मला ऐकायला मिळालं. 'एक तासभर थांब. मग कोणाची प्रेतं परत जातात ते कळेल,' असं विक्रम म्हणाला, असं कर्नल जोशी सांगतात. साडेतीन वाजता लेफ्टनंट जामवाल यांच्याकडून संदेश आला- 'ओ ये ये ये'. म्हणजे जामवाल ठरलेल्या ठिकाणी पोचले होते. थोड्या वेळाने ४ वाजून ३५ मिनिटांनी विक्रम यांच्याकडूनही मोहीम फत्ते झाल्याचा संदेश आला- 'ये दिल माँगे मोअर'.

## नदीच्या मधोमध एका दगडावर बांधलं आहे हे खास घर, पर्यटकांची असते मोठी गर्दी

काही लोकांना एकटं शांत ठिकाणी राहणं आवडतं. अशा ठिकाणी जिथे लोकांची गर्दी नसणार, फक्त निसर्गाची साथ असेल. अशा ठिकाणांच्या शोधात लोक जंगलांमध्ये किंवा डोंगरांवर जातात. असंच एक ठिकाण फार चर्चेत असतं. पण हे ठिकाण असतं खास आहे की, कुणीही त्याच्या प्रेमात पडेल. एका वाहत्या मोठ्या नदीच्या मधोमध एका मोठ्या दगडावरील घर. हे घर सर्बियामध्ये आहे. चला जाणून घेऊ या घराची कहाणी....

काही वेबसाइट्सच्या रिपोर्टनुसार, सर्बियातील ड्रीना नदीतील एका विशाल दगडावर असलेलं हे घर जगापासून दूर आहे. हे




अनोखं घर ५० वर्षाआधी तयार करण्यात आलं होतं. नॅशनल जियोग्राफिकवर या घराचा फोटो दाखवण्यात आल्यापासून हे घर चर्चेत आलं आणि इथे पर्यटकही येऊ लागलं. हे घर बॅजिना बास्ता नावाच्या एका वस्तीजवळ वाहणाऱ्या नदीत बनलं आहे. हे टारा नॅशनल पार्कच्या जवळ आहे.

एका विशाल दगडावर बनलेलं हे घर ५० वर्षापासून वेगवेगळ्या वातावरणाचा सामना करत आहे. अनेकदा त्याची पडझड झाली. पण ते पुन्हा बनवण्यात आलं. १९६८ मध्ये हे घर बांधण्यात आलं होतं. नदीत पोहायला येणाऱ्या एका ग्रुपला अशा ठिकाणाचा शोध होता जिथे त्यांना स्वीमिंग दरम्यान आराम करायला मिळावा. अशात त्यांनी या दगडावर एख घर बांधलं. नावेने ते घरात जात होते.

हंगरीचे फोटोग्राफर इरीन बेकर या फोटो काढला. तेव्हा लोकांना या घराच्या सुंदरतेची जाणीव झाली. आजही बरेच लोक इथे येतात आणि या घरात वेळ घालवतात. आज हे घर एक फेमस टूरिस्ट डेस्टिनेशन झालं आहे.

## दुसऱ्या महायुद्धातील बंकरचा होणार लिलाव, किंमत वाचून व्हाल अवाक..



युद्धादरम्यान नेमकं काय होतं, सैनिक कसे जगतात, कसे बचाव करतात अशा अनेक गोष्टी जाणून घेण्याची उत्सुकता सामान्य लोकांमध्ये असते. युद्धावर आधारिक अनेक सिनेमांमध्ये ते बघायलाही मिळतं. अनेकांना सैनिकासारखं जीवन अनुभवण्याची ईच्छा असते. अशात तुम्ही त्यांचं जीवन अनुभवण्यासाठी त्यांच्या बंकरमध्ये राहू शकता. यांमध्ये दुसऱ्या महायुद्धातील सैनिक राहत होते. पण हे बंकर खरेदी करण्यासाठी मोठी किंमत तुम्हाला चुकवावी लागेल.

दुसऱ्या महायुद्ध काळातील बंकर लिलाव करण्याचा निर्णय इंग्लंडने घेतला आहे. इथे र्डीीशू मध्ये असलेले बंकर लिलाव केले जाणार. ज्यांची किंमत २ कोटी रूपये लावण्यात आली आहे. इतिहासातील एका भीषण युद्धाचे साक्षीदार असलेले हे बंकर २.१ एकर जंगलासोबत मिळतील.

द इवनिंग स्टँडर्डनुसार, सध्या इथे कोणत्याही डेव्हलपमेंटची परवानगी नाही. आता या ठिकाणाकडे लोक येऊ लागले आहेत. त्यांना येथील गोष्टी जाणून घ्यायच्या आहेत. येथील बंकर विकण्याचा प्रयत्न गेल्यावर्षी सुद्धा करण्यात आला होता. पण ३००,००० पाउंडमध्ये खरेदी करण्यासाठी यात कुणी इंटरेस्ट दाखवला नाही. त्यामुळे आता हे बंकर आजूबाजूच्या जमिनीसोबत विकण्याचा प्लान समोर आला आहे. ज्यानंतर काही लोक यात इंटरेस्ट दाखवत आहेत.

असं मानलं जातं की, हे बंकर ऋीशप एशिीळाशपींश्र ऊशर्रीीशपी चे असतील. जो युद्ध काळातील एक गुप्त प्रोजेक्ट राहिला असेल. इथे नव्या वेपन्सचे प्रोटोटाइम डेव्हलप केले जात असतील. असंही मानलं जातं की, बाउंसिंग बॉम्ब इन्व्हेंशन करणारे इरीपशी थरश्रश्रळी जवळच प्रयोग करत असतील. सध्या हे बंकर Foxwarren बंकर नावाने ओळखले जातात. जे Cobham जवळ आहेत. असंही मानलं जात आहे की, हे बंकर ऊशर्ललींशीी रेडशी संबंधित असतील. ज्यांची यावर्षीय किंमत १६५,००० पाउंड ठेवण्यात आली आहे. भारतीय करन्सीनुसार ही किंमत १,७२४७७३४ रूपये इतकी होते.

## या देशात कबरींमधून मानवी हाडे चोरी करत आहेत लोक, कारण वाचून बसेल धक्का....



तसं तर कोणत्याही गोष्टीची नशा करणं चुकीचच आहे. लोक नशेसाठी वेगवेगळ्या गोष्टींचा वापर करतात. काही दिवसांआधीचं समोर आलं होतं की, लोक सापाच्या विषाचाही नशेसाठी वापर करतात. आता एका देशातून असं समोर आलं आहे की, येथील लोक नशेसाठी कबरेतून लोकांचे सांगाडे बाहेर काढत आहेत. स्थिती इतकी वाईट झाली आहे की, या देशाच्या सरकारला इमर्जन्सी लागू करावी लागली आहे. आफ्रिकेच्या पश्चिम भागातील सियेरा लियोन देशातील ही घटना आहे.

सिएरा लियोनमध्ये मानवी हाडांपासून तयार होणारं सायकोएक्टिव ड्रग डोकेदुखी ठरत आहे. नशा करण्यासाठी लोक करबेतून मृत लोकांचे सांगाडे बाहेर काढत आहेत. बीबीसीनुसार, या देशात ही स्थिती इतकी गंभीर झाली आहे की, सरकारला इमरजन्सी लागू करावी लागली.

वेगवेगळ्या शहरांमध्ये कबरींमधून हाडे चोरी केली जात असल्याने पोलिसांना पाळत ठेवावी लागत आहे. झोंबी ड्रग किंवा कुश म्हटलं जाणारं हे ड्रग वेगवेगळ्या प्रकारच्या टॉक्सिक सब्सटेंसपासून तयार होतं, ज्यातील एक भाग म्हणजे मानवी हाडे आहेत.

हे ड्रग जवळपास सहा वर्षाआधी पश्चिम आफ्रिकन देशात समोर आलं होतं.

आउटलेटनुसार, ही एक अशी नशा आहे जी अनेक तास राहते. त्यामुळे ही एक मोठी समस्या बनत आहे. याचे डीलर कथितपणे दरोडेखोर बनले आहेत. जे कबरींमधून मानवी हाडे चोरी करतात.

या देशात या ड्रगमुळे मृत्यूदर वाढला आहे. सरकारकडून सांगण्यात आलं की, त्यांनी हे ड्रग नष्ट करण्यासाठी एक टास्क फोर्स तयार केली आहे. म्हणजे वेगवेगळ्या शहरांमध्ये असे केंद्र असतील ज्यात नशेच्या सवयीने पीडित लोकांची काळजी घेतली जाईल.